# देशदूत

शिल्पकार विकासाचा...

इंटरनेट आवृत्ती www.deshdoot.com | धुळे | वर्ष २८ । अंक २४८ । शनिवार, दि.२८ जून २०२५ । पाने-८ | किंमत ₹ ५ | मोबाईल आवृत्ती वाचा व वर


## शरद पवारांचा सरकारला सल्ला

**कोल्हापूर ।** भारताबाबत गैरसमज तयार होत आहेत दरम्यान, इस्त्रायल व इराण यांच्यातील संघर्षात भारताकडून स्पष्टपणे कुणाची बाजू घेतली जात नसल्यामुळे भराताबाबत गैरसमज वाढत असल्याचा दावा शरद पवार यांनी केला आहे. स्वातंत्र्यानंतर जवाहरलाल नेहरू, इंदिरा गांधी, मनमोहन सिंग, नरसिंह राव, अटल बिहारी वाजपेयी या सगळ्यांनी या आखाती देशातील लोकांच्या भावना नजरेसमोर ठेवून त्यांना नेहमीच पाठिंबा दिला होता. आपण इस्त्रायलशी शेतीबाबत संबंध ठेवले. पण राजकीय संबंध आपण ठेवले नव्हते.

## गणेश विसर्जनासाठी धोरण सादर करा!

**मुंबई ।** प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मोठ्या गणेशमूर्तींच्या विसर्जनासंदर्भात प्रथा, परंपरांचा मान राखत पर्यावरणाच्या दीर्घकालीन उपाययोजनांचा समावेश असलेले धोरण तयार करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी दिले. तसेच गणेशमूर्ती तयार करताना पर्यावरणस्नेही सामुग्रीचा वापर आणि नैसर्गिक रंगाचा वापर करण्याची सूचनाही फडणवीस यांनी दिल्या. प्लास्टर ऑफ पॅरिसच्या (पीओपी) गणेश मूर्तींच्या विसर्जनासंदर्भात न्यायालयाने निर्देश दिले आहेत.

## संपादकीय

### अपेक्षांचे जड झाले ओझे...

दप्तराचे ओझे सहज पेलणाऱ्या मुलांना पालकांच्या अपेक्षांचे ओझे मात्र पेलवेनासे होत आहे. परिणामी विद्यार्थ्यांच्या आत्महत्या ही खोलवर मुरलेली समस्या झाली आहे. तिची पाळेमुळे खेडोपाडी पसरली आहेत. सांगली जिल्हा आटपाडी तालुक्यातील नेलकरंजी गावात नुकतीच अशी घटना घडली. खासगी शिकवणीच्या ठिकाणी घेतलेल्या 'नीट'च्या सराव परीक्षेत मुलीने मनासारखे गुण मिळवले नाहीत. याचा राग येऊन तिच्या वडिलांनी तिला इतके बेदम मारले की, त्यात त्या मुलीचा मृत्यू झाला. यातील विदारकता अशी... मुलीचे वडील मुख्याध्यापक तर आई सरपंच आहे. तरीही तिची सराव परीक्षा होती आणि विशेष गुण मिळवण्याची संधी तिच्याकडे होती हेही त्यांच्या लक्षात येऊ नये? उच्चशिक्षित पालकांनाही मुलांचे मन समजत नसेल तर त्या मुलांनी काय करावे? मुलीची क्षमता, तिच्या मनाचा कल, तिची अभिरुची, कौशल्ये, तिला त्या क्षेत्राची आवड आहे? असे कोणतेही प्रश्न त्यांनाच नव्हे, तर इतर पालकांनाही पडू नयेत? पान २ वर

## हिंदी सक्तीच्या निर्णयावरुन भाजपा एकाकी

# मविआची 'मनसे' साथ!

## काँग्रेस, राष्ट्रवादीचाही राज ठाकरेंना पाठिंबा



**मुंबई ।** राज्य शिक्षण मंडळाच्या मराठी आणि इंग्रजी माध्यमांच्या शाळेत इयत्ता पहिलीपासून त्रिभाषा सूत्र लागू करण्याच्या विरोधात काढण्यात येणाऱ्या मोर्चात काँग्रेस सहभागी होणार असल्याचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सकपाळ यांनी शुक्रवारी केले आहे. तर या मोर्चात कार्यकर्त्यांनी सहभागी व्हावे असे पत्रक शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी काढले आहे. उबाठा गटाने आधीच राज ठाकरेंना पाठींबा दिलेला आहे.त्यामुळे भाजपा या विषयावर एकाकी पडल्याचे दिसत आहे.

मनसे आणि शिवसेना उद्धव ठाकरे गटाकडून हिंदी सक्तीविरोधात मोर्चा काढला जाणार आहे. आधी ठाकरे गट आणि मनसेकडून वेगवेगळे मोर्चे काढले जाणार होते. मात्र या मुद्यावर सर्व पक्ष, संस्था, साहित्यिक आणि मराठी प्रेमींचा एकच मोर्चा निघावा अशी काँग्रेसची भूमिका होती, असे सकपाळ यांनी सांगितले.

काँग्रेसने मराठी सन्मान मोर्चात सहभागी व्हावे यासाठी मनसे प्रमुख राज ठाकरे यांच्यावतीने बाळा नांदगावकर यांनी काँग्रेसचे नेते विजय वड्डेटीवार यांना संपर्क केला होता. मराठीसाठी एकत्र येण्याची ही वेळ आहे. ही हाक पक्षाने नाही तर भाषेने दिली आहे, असे याबाबत माहिती देताना वड्डेटीवार यांनी म्हटले आहे.

उद्धव ठाकरे गटाकडून संजय राऊत यांनी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सकपाळ यांच्याशी चर्चा करून मोर्चात सहभागी होण्याचे पान २ वर

### ठाकरे बंधूंच्या मनोमिलनाची पहिली झलक



महायुती सरकारने राज्यात पहिलीपासून हिंदी विषय सक्तीचा केल्यामुळे वाद पेटला आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी हिंदीसक्तीविरोधात ५ जुलै रोजी सर्वपक्षीय मोर्चाची हाक दिली आहे. या मोर्चामध्ये ठाकरे गट सुद्धा सामील होणार हे आता स्पष्ट होत आहे. मनसेचे नेते संदीप देशपांडे आणि ठाकरे गटाचे युवा संघटनेचे नेते वरुण सरदेसाई हे पहिल्यांदाच एकत्र आले आहे. मुंबईतील दादरमध्ये एका हॉटेलमध्ये दोन्ही नेत्यांची भेट झाली.

### मोर्चाला शरद पवार गटाचा पाठिंबा

दरम्यान, पहिलीपासून त्रिभाषा सूत्र लागू करण्याच्या निर्णयाविरोधातील मोर्चाला राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाने पाठिंबा दिला आहे.राज्य सरकार महाराष्ट्रात जी हिंदी सक्ती लादू इच्छित आहे त्याविरोधात ५ जुलै २०२५ रोजी मुंबईतील गिरगाव चौपाटीवरून मोर्चा आयोजित करण्यात आला आहे. प्रत्येक मराठी माणसाने या मोर्चात सहभागी व्हावे, असे आवाहन पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी केले आहे. विविध भाषा शिकण्याला किंबहुना हिंदी भाषेला कुणाचाही विरोध नाही. पण इयत्ता पहिलीपासूनच प्राथमिक शिक्षण हे मातृभाषेतून व्हावं असा आग्रह आहे. जो योग्य आहे आणि मराष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवारफ पक्ष म्हणून आमचीही हीच भूमिका आहे. शैक्षणिक धोरणाच्या त्रिभाषा सूत्राआडून मातृभाषेला डावलण्यासाठी प्रयत्न होत असतील तर मराठी माणूस एकदिलाने त्याचा विरोध करणार. महाराष्ट्र हिताचा प्रश्न उभा राहतो तेव्हा महाराष्ट्रासाठी आणि जेव्हा राष्ट्रहिताचा प्रश्न उभा राहतो तेव्हा राष्ट्रासाठी पक्षीय भेदाभेद बाजूला सारून उभं राहणं हेच राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार पक्षाचे स्पष्ट धोरण आहे, असे जयंत पाटील यांनी म्हटले आहे.



पुरी । भगवान जगन्नाथाच्या रथोत्सवाला शुक्रवारपासून प्रारंभ झाला असून पहिल्याच दिवशी लाखों भाविक या उत्सवात सहभागी झाले.

## डिझेल भरायला गेले अन् पाणी भरुन आले

# मुख्यमंत्र्यांच्या ताफ्यालाच फटका



**इंदूर ।** मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री डॉ. मोहन यादव यांच्या ताफ्यासाठी इंदूरहून रतलामला १९ इनोव्हा कार मागविण्यात आल्या होत्या. शुक्रवारी रतलाममध्ये रीजनल कॉन्क्लेवचे आयोजन करण्यात आले होते. याला यादव यायचे होते. म्हणून गुरुवारी रात्री या १९ इनोव्हा कार डिझेल भरण्यासाठी ढोसी गावाजवळच्या पेट्रोल पंपावर पाठविण्यात आल्या. डिझेल भरून या कार परत येत होत्या. इतक्यात एकेक करून कार बंद पडायला लागल्या. यामुळे धावपळ उडाली.

इंधनात काहीतरी गडबड असल्याचे लक्षात आले. त्यांनी प्रशासनाला कळविल्यावर गोंधळ उडाला. यामुळे सरकारी अधिकारी, पोलीस या पेट्रोल पंपावर आले, काही ड्रायव्हर देखील या ठिकाणी आले. या काळात जे लोक या पंपावरून इंधून भरून गेले होते ते देखील तक्रार घेऊन यायला लागले. या लोकांच्या इंधन टाकीत पेट्रोल, डिझेल ऐवजी पाणी सापडले. अक्षरशः पेट्रोल पंपावरच गॅरेज सुरु झाले. मेकॅनिकला बोलविण्यात आले. दुचाकींच्या टाक्या खोलून त्यातील इंधन काढले गेले तर त्यात पाणी सापडले. अनेकांच्या बाबतीत हे झाल्याने प्रशासनाने अखेर तो पेट्रोल पंपच सील केला आहे.






cmyk